महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल

सन 2021-2022

प्रकरण एक

सर्वसाधारण

1.1 लेखापरीक्षण केलेल्या संस्था

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षक असून ते महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम,1930 च्या उपबंधानुसार जिल्हा परिषदांच्या व पंचायत समितीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करतात. एकूण 34 जिल्हा परिषदांचे व 351 पंचायत समित्यांचे सन 2021-2022 या वर्षाचे लेखापरीक्षण पुर्ण करण्यात आले आहे.

1.2 अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष जमा व खर्च रकमा

सन 2021-2022 मधील अर्थसंकल्पीय अंदाज, प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व महसूली खर्च सन 2020-2021 या वर्षाच्या संबंधीत आकड्यांसह खाली दिला आहे.

(रुपये कोटीमध्ये)

वर्ष	2020-2021			2021-2022		
निधीचा तपशील	अर्थसंकल्पीय तरतूद	प्रत्यक्ष जमा	प्रत्यक्ष खर्च	अर्थसंकल्पीय तरतूद	प्रत्यक्ष जमा	प्रत्यक्ष खर्च
1	2	3	4	5	6	7
हस्तांतरीत	42474.16	43649.39	42282.97	44599.02	44672.56	41506.64
अभिकरण	2512.37	2683.43	2589.01	2750.39	2790.43	2212.25
जिल्हा परिषद	1423.30	1293.37	1722.17	1682.24	1731.21	1484.68
एकूण	46409.83	47626.19	46594.15	49031.65	49194.20	45203.57

1) सन 2021-2022 या वित्तीय वर्षामध्ये हस्तांतरीत निधी अंतर्गत जिल्हा परिषदांना रक्कम रुपये 44672.56 कोटी अनुदान उपलब्ध झाले असुन उपलब्ध अनुदानाचे अधिन जिल्हा परिषदांनी रक्कम रुपये 41506.64 कोटी खर्च नोंदविला आहे. सदर खर्चाची टक्केवारी 92.91% आहे.

2) सन 2021-2022 या वित्तीय वर्षामध्ये अभिकरण निधी अंतर्गत रक्कम रुपये 2790.43 कोटी प्राप्त अनुदान व खर्च रक्कम रुपये 2212.25 खर्च नोंदविला आहे. खर्चाची टक्केवारी 79.28% आहे.

3) जिल्हा परिषद निधी प्राप्त अनुदान रक्कम रुपये 1731.21 कोटी व खर्च रक्कम रुपये 1484.68 कोटी नोंदविला आहे. खर्चाची टक्केवारी 85.76% आहे.

1.3 महसुली जमा रकमा

जिल्हा परिषदेच्या सन 2020-2021 मधील महसुली जमा रकमांचा व चालु वर्ष 2021-2022 मधील महसुली जमा रकमांचा निधीनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

अ.क्र	तपशिल	जमा रकमा		फरक	
		2020-2021	2021-2022	रक्कम	टक्केवारी
1	हस्तांतरीत निधी	43649.39	44672.56	1023.17	2.34%
2	अभिकरण निधी	2683.43	2790.43	107	3.99%
3	जिल्हा परिषद स्वउत्पन्न	1293.37	1731.21	437.84	33.85%
एकूण		47626.19	49194.20	1568.01	3.29%

सन 2021-2022 या वित्तीय वर्षातील हस्तांतरीत निधी प्राप्त अनुदानाचे अधिन जमा रक्कम रुपये 44672.56 कोटी ची तुलना सन 2020-2021 या वित्तीय वर्षाशी केली असता 1023.17 कोटीची वाढ झालेली असुन 2.34 टक्के नी वाढ झालेली आहे. अभिकरण निधी प्राप्त अनुदान रुपये 2790.43 कोटीची तुलना 2020-2021 या वर्षातील अनुदानाशी केली असता रुपये 2683.43 कोटी म्हणजे 107 कोटी म्हणजे 3.99 टक्के वाढ दिसुन येते. तसेच जिल्हा परिषद स्वउत्पन्नाच्या बाबतीत रुपये 1293.37 कोटी ची तुलना 2020-2021 शी केली असता रुपये 437.84 कोटी म्हणजे 33.85 टक्के वाढ दिसुन येते.

1.4 महसुली लेख्यांवरील खर्च

सन 2021-2022 (रुपये 45203.57 कोटी) या वर्षाच्या महसुली खर्चात सन 2020-2021 (रुपये 46594.15 कोटी) च्या तुलनेने (-)1390.58 म्हणजे (-)2.98 टक्के घट झाल्याचे आढळून आले आहे. त्याचा निधीनिहाय तपशिल खालीलप्रमाणे:-

(रुपये कोटीत)

अ.क्र	तपशिल	खर्च		फरक	
		2020-2021	2021-2022	रक्कम	टक्केवारी
1	हस्तांतरीत निधी	42282.97	41506.64	-776.33	-1.84%
2	अभिकरण निधी	2589.01	2212.25	-376.76	-14.55%
3	जिल्हा परिषद स्वउत्पन्न	1722.17	1484.68	-237.49	-13.79%
एकूण		**46594.15**	**45203.57**	**-1390.58**	**-2.98%**

सन 2021-2022 या वित्तीय वर्षातील हस्तांतरीत निधी प्राप्त अनुदानाचे अधिन झालेला खर्च रक्कम रुपये 41506.64 कोटी ची तुलना सन 2020-2021 या वित्तीय वर्षाशी केली असता -776.33 कोटी ने घट झालेली असुन -1.84 टक्के नी घट झालेली आहे. अभिकरण निधी प्राप्त अनुदानाचे अधिन झालेला खर्च रक्कम रुपये 2212.25 कोटी ची तुलना 2020-2021 या वर्षाशी केली असता -376.76 कोटी म्हणजे 14.55 टक्के घट झालेली आहे. जिल्हा परिषद स्वउत्पन्नाबाबत 1484.68 कोटी झालेला खर्चाची तुलना 2020-2021 या वर्षातील खर्चाशी केली असता -237.49 कोटी म्हणजे -13.79 टक्के घट झालेली दिसुन येते.

1.5 महसुली लेख्यांबाहेरील जमा रकमा

सन 2021-2022 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

(**अ**) **जमा रकमा :-** महसुली लेख्यांबाहेरील जमा रकमांमध्ये राज्य शासनाकडून (व्याजी किंवा बिनव्याजी) तसेच इतर संस्थाकडुन मिळालेल्या कर्जाच्या, जिल्हा परिषदांनी मंजूर केलेल्या कर्जाच्या वसुलीचा, मंजूर केलेल्या आगाऊ रकमेच्या वसुलीचा आणि घसारा निधी, निवृत्तीवेतन निधी इत्यादी विविध योजनांबाबतच्या व्यवहारासह ठेवीच्या व्यवहाराचा समावेश आहे.

(**ब**) **कर्जे** :- यापुर्वीच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे शासनाव्दारे जिल्हा परिषदांना मंजूर करण्यात येणारे तपशिलवार लेखे महालेखापाल ठेवतात. जिल्हा परिषदांना खालीलप्रमाणे दोन प्रकारचे लेखे ठेवावे लागतात.

(1) शासनाकडून मिळालेली, परत केलेली व परतफेड न केलेली कर्ज व त्यांचे थकबाकी दर्शविणारे लेखे.

(2) जिल्हा परिषदांनी व्यक्तिगत दिलेली कर्जे, त्यांची वसूली व थकबाकी यांचे लेखे, जिल्हा परिषदांनी कर्जाचे लेखे व्यवस्थित व अद्ययावत ठेवण्याकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

(**क**) **ठेवी :-** जिल्हा परिषदांकडे मोठया प्रमाणात ठेवी आहेत. परंतु त्यांचे लेखे ठेवण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. मागील अहवालात नमूद केल्याप्रमाणे पुष्कळदा जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या ठेव नोंदवहया अपूर्ण होत्या. एवढेच नव्हे तर मागील वर्ष अखेरची शिल्लक बिनचुकपणे पूढे ओढण्यात आली नव्हती, जमा व प्रदान रकमांच्या नोंदी नोंदवहयांमध्ये केलेल्या नव्हत्या. त्यांचा वार्षिक लेख्यांशी मेळ बसत नव्हता. त्याचप्रमाणे ठेवी परत देय होतात, तेव्हापासुन तीन वर्षापेक्षा अधिक काळ अदत्त असलेल्या ठेवी महसुल खाती जमा करण्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 च्या नियम 219 अन्वये आवश्यक असलेली कार्यवाही करण्यात आली नव्हती.

1.6 महसुली लेख्यांबाहेरील खर्चाच्या रकमा

सन 2021-2022 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहेत.

महसुली लेख्यांबाहेरील खर्चात शासनाकडून मिळणाऱ्या कर्जातुन विविध विकास कार्ये आणि योजना याकरिता कर्जाचे रुपाने जिल्हा परिषदांनी संवितरित केलेल्या रकमांचा समावेश होतो. या कर्जाच्या लेख्यांकडे सर्वसाधारणपणे दूर्लक्ष केले असल्याचे आढळले. कर्जाच्या वापरासंबंधी प्रमाणपत्रे विहीत मुदतीत सादर करण्यात आली नव्हती.

तसेच महसुली लेख्यांबाहेरील खर्चाच्या रकमांमध्ये जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिलेल्या निरनिराळया आगाऊ रकमा व इतर ठेवीबाबतच्या व्यवहारांचा समावेश होतो. वरील परिच्छेद 1.5(क) मध्ये ठेवींच्या व्यवहारासंबंधी व्यक्त केलेले अभिप्राय लेख्यांबाहेरील खर्चाच्या रकमांबाबतच्या व्यवहारांनाही लागू आहेत.

1.7 जिल्हा परिषदांचे वार्षिक लेखे

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 65 प्रमाणे जिल्हा परिषदांनी प्रत्येक वर्षाचे लेखे पुढील वर्षाच्या 30 जुन रोजी बंद केले पाहिजेत व ते स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागातर्फे प्रमाणित करुन शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

सन 2021-2022 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

(अ) सन 2021-2022 च्या वार्षिक लेख्यांबाबत :- महाराष्ट्रातील एकूण 34 जिल्हा परिषदांपैकी 28 जिल्हा परिषदांचे सन 2021-2022 चे वार्षिक लेखे स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे प्रमाणिकरण करण्यात आले आहे. उर्वरीत जिल्हा परिषदांचे **(कोल्हापूर, बीड**, **अमरावती**, **बुलढाणा**, **वाशिम**, **गोंदिया)** सन **2021-2022** चे वार्षिक लेखे प्रमाणिकरण प्रलंबित आहे.

वार्षिक लेखे प्रमाणित करताना त्यामध्ये फार मोठया प्रमाणात त्रुटी आढळतात व त्यांची पुर्तता करणेसाठी पुन्हा संबंधित जिल्हा परिषदेकडे परत पाठवावे लागतात. जिल्हा परिषदांनी वार्षिक लेखे पुर्तता करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जेणे करुन लेख्यांचे प्रमाणिकरण विनाविलंब होऊ शकेल.

(ब) **वार्षिक लेख्यांची प्रसिध्दी :-** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम 136 अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियम 66(ए-9) प्रमाणे जिल्हा परिषदांना त्यांचे मागील वर्षाचे लेखे चालू वर्षाच्या 15 नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तेव्हा वार्षिक लेखे शासकीय राजपत्रात वेळेवर प्रसिध्द करण्याच्याबाबतीत जिल्हा परिषदांनी विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

1.8 घसारा निधी

सन 2021-2022 चे सर्व जिल्हयांचे वित्त विभागाचे अहवाल पाहिले असता बहुतांश अहवालांमध्ये आढळलेल्या आक्षेपांवरुन खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहे.

(अ) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-1088/सीआर-2902/28, दिनांक 30 मार्च, 1988 च्या आदेशान्वये दिनांक 09 सप्टेंबर 1980 चे आदेश रद्दबातल करुन शासनाच्या क्रमांक झेडपीए-1080/4769/सीआर-1459/28, दिनांक 01 जानेवारी 1988 च्या अधिसुचनेच्या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील तरतुदीनुसार घसारा निधी ठेवणे ही बाब अनिवार्य ठरविण्यात आली. यासाठी शासनाने घसारा निधी नियमित करण्यासाठी क्रमांक झेडपीए-1076/4764/तीस, दिनांक 24 सप्टेंबर, 1976 अन्वये पाठविलेल्या नमुना नियमावलीस अधीन राहून नवीन नियमावली तयार करुन शासन मान्यतासाठी पाठविण्याबाबत जिल्हा परिषदांना सूचना दिल्या होत्या. या संदर्भात शासनाने मागविलेल्या माहितीनुसार 34 जिल्हा परिषदांनी तयार केलेल्या नियमावलीस शासनाने मान्यता दिली आहे.

(ब) सन 2021-2022 चे लेखापरीक्षणाचे वेळी बहुतांश जिल्हा परिषदांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 मधील नियम 241 मध्ये विहीत केलेल्या टक्केवारी पर्यंत घसारा निधीत अंशदान न करता तदर्थ तत्वावर केल्याचे आढळुन आले.

(क) जिल्हा परिषदेच्या स्तरावर विहीत केलेल्या नियमावलीनुसार घसारा निधीबाबत माहिती उपलब्ध नसल्याने दिनांक 01 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2022 पर्यंत नियमाप्रमाणे जिल्हा परिषदच्या घसारा निधीत किती रक्कम जमा व्हावयाला पाहिजे होती, त्याची निश्चिती करता आली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या निधीकडे नेमकी किती रक्कम येत आहे व ती प्रत्येक वर्षी किती राहणार आहे, याचा उलगडा झाला नाही.

1.9 प्राथमिक शिक्षण वर्गणी

मुंबई शिक्षण अधिनियम 1947 च्या 42 व्या कलमानुसार व त्यातील नियम क्रमांक 142 मधील तरतुदीप्रमाणे विविध प्राधिकृत नगरपालिकांकडून देय असलेली प्राथमिक शिक्षण वर्गणी जिल्हा परिषदा वेळच्यावेळी वसुल करीत नसल्याचे खालील तपशिलावरुन स्पष्ट होते.

(अमरावती, नागपुर व औरंगाबाद विभाग वगळून) **(रुपये लाखांत)**

01 एप्रिल 2021 पर्यंत थकित असलेली वर्गणी	2021-2022 मध्ये येणे असलेली वर्गणी	एकूण	2021-2022 मध्ये वसुल केलेली वर्गणी	31 मार्च 2022 रोजी थकित असलेली वर्गणी
1	2	3	4	5
7955.75	289.62	8245.37	24.89	8220.48

वरीलप्रमाणे शिल्लक असलेल्या थकबाकीच्या सव्याज वसुलीकरिता उपरोक्त नियमावलीचे नियम क्रमांक 143 मधील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते.

प्राथमिक शिक्षण वर्गणीबाबत वरील माहिती पाहता, येणे असलेली प्राथमिक शिक्षण वर्गणीची रक्कम फार मोठ्या प्रमाणात थकीत आहे. शासनाच्या नगरविकास विभागाच्या आदेश क्रमांक जीनटी-1075/1782/युडी-10, दिनांक 01 डिसेंबर 1976 अन्वये संबंधित जिल्हाधिकारी यांनी नगरपालिकांकडून प्राथमिक शिक्षणाच्या वर्गणीची रक्कम नगरपरिषदांच्या देय अनुदानातुन वसुल करुन ती संबंधित जिल्हा परिषदेला अदा करावयाची आहे परंतु, शासनाच्या वरील निर्णयाप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे वरील थकबाकीच्या आकडेवारीवरुन दिसुन येते. थकित वर्गणी त्वरेने वसुल करण्याबाबत कारवाई करणे आवश्यक आहे.

1.10 समायोजित व्हावयाच्या अग्रिम व अनामत (ठेव) रकमा

(अ) **अग्रिम रकमा :-** जिल्हा परिषदेमध्ये कर्मचा-यांना व संबंधित खात्याच्या अधिका-यांना वेगवेगळया कारणांसाठी दिलेल्या आगाऊ रकमांचे दिनांक 31 मार्च 2022 पर्यंत ब-याच प्रमाणात समायोजन झालेले नव्हते. दिनांक 31 मार्च 2021 रोजी जिल्हा परिषदेच्या लेख्यांमध्ये शिल्लक असलेल्या आगाऊ रकमांचा वर्षवार तपशील खालीलप्रमाणे आहे. सदर माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन घेण्यात आलेली आहे.

(रुपये लाखांत)

वर्ष	एकूण रुपये
1962-63 ते 2016-2017	3571.89
2017-2018	540.85
2018-2019	450.33
2019-2020	527.74
2020-2021	570.18
2021-2022	2268.74
एकूण रुपये	**7929.73**

(ब) **अनामत (ठेव) रकमा** :- दिनांक 31 मार्च, 2022 रोजी जिल्हा परिषदांच्या लेख्यांमध्ये असलेल्या अनामत (ठेव) रकमांचा वर्षवार तपशील खालीलप्रमाणे आहे. सदरची माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीनुसार आहे.

(रुपये लाखांत)

वर्ष	प्रलंबित अनामत (ठेव)
1962-63 ते 2016-2017	22429.55
2017-2018	11867.65
2018-2019	15605.40
2019-2020	25268.20
2020-2021	27762.09
2021-2022	44607.82
एकूण रुपये	**147540.71**

1.11 जिल्हा परिषदांकडील मत्ता व दायित्वे

महाराष्ट्र राज्यातील 34 जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्हा परिषदनिहाय दिनांक 31 मार्च, 2022 रोजीचा मत्ता व दायित्वाचा तक्ता सोबत जोडला आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमए एस-2013/प्र.क्र14/वित्त-6, दिनांक 05/10/2013 अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी विहीत केलेल्या मॉडेल अकाऊन्टींग सिस्टिमच्या नमुना क्रमांक 1 ते 8 मध्ये मासिक/वार्षिक लेखे ठेवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तथापि, जिल्हा परिषदांकडून नमुना नंबर 1 ते 3 मध्येच सद्यस्थितीमध्ये लेखे ठेवण्यात आलेले असल्याचे दिसून येते. मॉडेल अकाऊन्टींग सिस्टिमच्या नमुना नंबर 4 येणे देणे नोंदवही, नमुना नंबर 5 स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना नंबर 6 जंगम मालमत्ता नोंदवहया परिपुर्ण नसल्यामुळे जिल्हा परिषदांनी तयार केलेल्या मत्ता व दायित्व तक्त्यातील आकडेवारीची सत्यता उपलब्ध अभिलेख्यांवरुन पडताळून पाहता आली नाही. सदर तक्त्यामध्ये स्थिरत्वाच्या बाबी (Fix Assets) (उदाहरणार्थ इमारती, रस्ते इत्यादी) नमूद केलेल्या नसुन फक्त रोकड सुलभ मत्तांच्या बाबी (Current Assets) नमुद केलेल्या आहेत. तक्त्यावरुन जिल्हा परिषदांकडे एकूण दायित्व रुपये 7,25,039.16 लाख व एकूण मत्ता रुपये 18,19,041.39 लाख असल्याचे दिसते.

तसेच सोबतच्या तक्त्यात जिल्हा परिषदांनी दिलेल्या माहितीच्या आधारे जिल्हा परिषदांनी शासनाकडे भरावयाच्या रकमा व जिल्हा परिषदांना शासनाकडून येणे असलेल्या रकमा दाखविल्या आहेत. यावरुन जिल्हा परिषदांनी शासनाकडे भरावयाच्या एकूण रकमा रुपये 2,04,318.62 लाख इतक्या आहेत. तसेच जिल्हा परिषदांना शासनाकडून येणे असलेली रक्कम रुपये 2,72,850.93 लाख इतकी आहे. पैकी जिल्हा परिषद उत्पन्न रुपये 1,10,377.41 लाख व शासकीय अनुदान रुपाने मिळणारे उत्पन्न रुपये 1,62,473.52 लाख इतके आहे. याचा तपशिल सोबत जोडलेला आहे. एकूण दायित्वापैकी रुपये 63738.65 लाख जिल्हा परिषदांकडून इतर संस्थांना अनुदानापोटी देय आहेत. सदर रकमांचा तक्ता सोबत जोडला आहे. सन 2020-2021 मध्ये शासनाकडून जिल्हा परिषदांना मिळावयाच्या अनुदानापैकी बाकी रक्कम रुपये 1,22,048.80 लाख होती. सन 2021-2022 अखेर शासनाकडुन जिल्हा परिषदांना मिळावयाची अनुदानाची बाकी रक्कम रुपये 1,10,377.41 लाख येणे आहे.

टिप :- परिच्छेद क्रमांक 1.1 ते 1.11 करीता सदर माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन घेण्यात आली आहे.

*****

दिनांक 31 मार्च 2022 अखेर मत्ता व दायित्वाचे विवरण

दायित्वे (रुपये लाखांत)

अ.क्र.	जि.प.चे नांव			कर्जे व आगाऊ रकमा				अदत्त देयके	जि.प.चे देणेकरी
		ठेवी		शासकीय कर्जे		इतर कर्जे			
		जि.प	पं.स.	अखर्चित	देय हप्ते	अखर्चित	देय हप्ते		
1	2	3	4	5	6	7	8	9	10
1	ठाणे	1023.07	57.62	0	0	0	0	0	0
2	पालघर	3404.65	53.97	0	0	0	0	0	0
3	रायगड	7628.27	0	0	0	0	0	0	0
4	रत्नागिरी	1458.48	28.24	0	0	0	0	0	0
5	सिंधुदूर्ग	2689.94	63.20	0	0	0	0	0	0
6	नाशिक	11240.30	185.69	0	0	0	0	0	0
7	धुळे	2523.25	1195.23	0	0	0	0	34033.20	0
8	नंदूरबार	946.92	240.81	0	0	110.96	0	0	0
9	जळगाव	1830.93	67.89	0	0	0	0	0	0
10	अहिल्यानगर	1356.94	475.85	0	0	0	0	0	0
11	पुणे	28764.04	598.66	0	0	0	0	0	0
12	सातारा	3318.58	83.42	0	0	0	0	0	0
13	सांगली	3595.31	0	0	0	0	0	0	0
14	कोल्हापूर	33650.97	1790.13	0	0	0	0	0	0
15	सोलापूर	2661.63	1237.61	0	0	0	0	0	0
16	अमरावती	2246.00	0	0	0	0	0	0	0
17	अकोला	463.24	234.35	0	0	0	0	0	8441.75
18	वाशिम	1149.20	0	0	0	0	0	0	5151.49
19	यवतमाळ	871.97	675.78	0	0	0	0	0	0
20	बुलढाणा	1893.00	991.00	0	0	0	0	0	0
21	नागपूर	2794.15	0	0	0	0	0	0	0
22	वर्धा	1461.12	7.11	0	0	0	0	0	0
23	भंडारा	2267.00	0	0	0	0	0	0	0
24	गोंदिया	1111.43	0	0	0	0	0	0	0
25	चंद्रपूर	4294.00	4135.08	0	0	0	0	0	0
26	गडचिरोली	0	465.93	7000.60	0	0	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	2456.14	729.86	12.00	0	0	0	0	0
28	जालना	2636.06	0	0.22	0	0	0	0	0
29	बीड	0	1455.00	0	0	0	0	0	0
30	परभणी	1341.33	225.35	0	0	0	0	0	0
31	हिंगोली	610.14	766.18	0	0	0	0	0	0
32	नांदेड	130.93	2.94	0	0	0	0	0	0
33	धाराशिव	2651.52	0	0	0	0	0	0	0
34	लातूर	573.91	0	0	0	0	0	0	0
एकूण एकंदर		**135044.42**	**15766.90**	**7012.82**	0	**110.96**	0	**34033.20**	**13593.24**

(रुपये लाखांत)

अ.क्र.	जि.प.चे नांव	जि.प.कडून पं.स.व ग्रा.पं.ला देय अनुदान	शासनाकडे भरणा करावयाची रक्कम	विशेष निधी	इतर शासकीय खर्च	एकूण दायित्वे	मत्तेचे दायित्वावर अधिक्य	एकूण बेरीज (15 + 16)
		11	12	13	14	15	16	17
1	ठाणे	707.80	2279.90	0	0	4068.39	35679.32	39747.71
2	पालघर	873.13	7880.86	0	0	12212.61	29480.47	41693.08
3	रायगड	4217.45	0	0	0	11845.72	10633.51	22479.23
4	रत्नागिरी	2549.37	16652.18	7171.82	0	27860.09	2560.05	30420.14
5	सिंधुदूर्ग	0	3194.09	0	0	5947.23	15992.38	21939.61
6	नाशिक	1963.12	4928.57	40993.20	0	59310.88	41557.48	100868.36
7	धुळे	0	3963.72	1072.96	0	42788.36	-2860.69	39927.67
8	नंदूरबार	0	7394.50	0	0	8582.23	61869.50	70451.73
9	जळगाव	614.74	52195.24	0	0	54819.76	-3507.28	51312.48
10	अहिल्यानगर	1487.11	5317.55	0	0	8637.45	49477.64	58115.09
11	पुणे	32642.97	4354.67	0	0	66360.34	19382.70	85743.04
12	सातारा	1742.91	16902.76	50.00	0	22097.67	34143.63	56241.30
13	सांगली	1061.42	0	0	0	4656.73	18112.07	22768.80
14	कोल्हापूर	6427.58	870.71	6330.71	0	49070.10	7486.63	56556.73
15	सोलापूर	0	4000.00	0	0	7899.24	49133.18	57032.42
16	अमरावती	1886.45	0	0	137363.04	141495.49	18115.55	159611.04
17	अकोला	988.25	2694.04	0	0	12821.63	15792.29	28613.92
18	वाशिम	0	0	0	0	6300.69	23541.86	29842.55
19	यवतमाळ	0	0	0	0	1547.75	99583.29	101131.04
20	बुलढाणा	165.32	0	0	0	3049.32	212107.69	215157.01
21	नागपूर	4343.56	0	568.40	0	7706.11	2447.69	10153.80
22	वर्धा	0	6778.38	0	0	8246.61	27028.94	35275.55
23	भंडारा	2.13	4920.24	1205.40	0	8394.77	7106.89	15501.66
24	गोंदिया	0	0	0	0	1111.43	618.24	1729.67
25	चंद्रपूर	378.17	2578.64	0	0	11385.89	3023.14	14409.03
26	गडचिरोली	0	0	0	0	7466.53	26790.27	34256.80
27	छत्रपती संभाजीनगर	0	1599.43	0	0	4797.43	55620.34	60417.77
28	जालना	0	5464.48	0	0	8100.76	34732.21	42832.97
29	बीड	899.00	221.00	0	0	2575.00	88337.20	90912.20
30	परभणी	0	580.57	56238.62	0	58385.87	618.83	59004.70
31	हिंगोली	0	1844.30	0	0	3220.62	18392.35	21612.97
32	नांदेड	539.63	13441.40	166.49	0	14281.39	46115.61	60397.00
33	धाराशिव	248.54	31755.17	259.71	0	34914.94	18280.22	53195.16
34	लातूर	0	2506.22	0	0	3080.13	26609.03	29689.16
एकूण एकंदर		**63738.65**	**204318.62**	**114057.31**	**137363.04**	**725039.16**	**1094002.23**	**1819041.39**

दिनांक 31 मार्च 2022 अखेरची स्थिती

मत्ता (रुपये लाखांत)

अ.क्र.	जि.प.चे नांव	जिल्हा निधीची रक्कम		जि.प.चे घेणेकरी	वसुली योग्य मागण्या	कर्जे	अग्रिम
		रोख	गुंतवणूक				
1	2	3	4	5	6	7	8
1	ठाणे	15761.82	15761.82	1080.69	950.16	0	17.70
2	पालघर	36479.05	36479.05	0	0	0	86.28
3	रायगड	2579.47	12922.66	0	1143.15	7.81	28.25
4	रत्नागिरी	21391.35	21391.35	0	259.15	577.30	12.83
5	सिंधुदूर्ग	8381.77	18636.42	0	0	0.81	27.41
6	नाशिक	66997.28	93987.28	0	1332.83	0	93.61
7	धुळे	27958.28	37408.28	0	180.06	0	33.42
8	नंदूरबार	46154.61	69955.01	0	0	0	2.00
9	जळगाव	35520.11	49811.51	0	831.25	0	97.12
10	अहिल्यानगर	53398.25	53399.06	0	0	0	93.28
11	पुणे	43575.90	43575.90	0	0	0	109.68
12	सातारा	38255.81	45655.81	0	1016.88	0	35.20
13	सांगली	7702.24	13195.24	0	10.00	0	95.08
14	कोल्हापूर	52587.97	52587.97	0	19.62	0.45	0
15	सोलापूर	22038.22	53638.22	0	0	0	497.52
16	अमरावती	4288.46	6288.46	0	385.18	0	0
17	अकोला	24791.16	24791.16	0	1626.69	105.56	888.84
18	वाशिम	14142.55	29842.55	0	0	0	0
19	यवतमाळ	65144.08	68328.05	0	0	0	145.27
20	बुलढाणा	203670.00	214770.00	0	0	0	0
21	नागपूर	8935.22	0	0	0	0	2.07
22	वर्धा	33589.62	0	0	14.13	0	65.59
23	भंडारा	15177.91	300.00	0	0	0	18.02
24	गोंदिया	1377.87	0	0	1.00	0	0
25	चंद्रपूर	4549.50	7563.00	0	41.26	51.46	52.90
26	गडचिरोली	28670.65	0	0	327.09	0.50	2298.82
27	छत्रपती संभाजीनगर	41931.58	15755.04	0	0	0	65.26
28	जालना	17735.03	24300.00	0	0	0	90.94
29	बीड	73237.90	16450.00	0	503.00	0	721.30
30	परभणी	58431.73	5.00	0	0	3.62	87.84
31	हिंगोली	16584.83	4750.39	0	0	0	47.19
32	नांदेड	58899.66	883.05	0	0	0	281.31
33	धाराशिव	40305.37	10662.00	0	1968.09	0	0
34	लातूर	28657.71	0	0	1.31	20.17	13.29
एकूण एकंदर		**1218902.96**	**251275.90**	**1080.69**	**10610.85**	**767.68**	**6008.02**

(रुपये लाखांत)

अ.क्र.	जि.प.चेनांव	शासनाकडून मिळावयाची अनुदाने		विशेष निधीची शिल्लक		एकूण मत्ता	दायित्वाचे मत्तेवर अधिक्य	एकूण बेरीज (13+14)
		जि.प.उत्पन्न	शासकिय योजना	रोख	गुंतवणूक			
		9	10	11	12	13	14	15
1	ठाणे	21937.34	0	0	0	39747.71	0	39747.71
2	पालघर	2554.87	0	0	2572.88	41693.08	0	41693.08
3	रायगड	8320.08	0	57.28	0	22479.23	0	22479.23
4	रत्नागिरी	3510.51	1960.19	0	2708.81	30420.14	0	30420.14
5	सिंधुदूर्ग	2665.62	222.53	0	386.82	21939.61	0	21939.61
6	नाशिक	4497.02	430.17	0	527.45	100868.36	0	100868.36
7	धुळे	322.07	1400.88	0	582.96	39927.67	0	39927.67
8	नंदूरबार	0	0	0	494.72	70451.73	0	70451.73
9	जळगाव	572.60	0	0	0	51312.48	0	51312.48
10	अहिल्यानगर	1541.42	1308.70	0	1772.63	58115.09	0	58115.09
11	पुणे	38034.97	4022.49	0	0	85743.04	0	85743.04
12	सातारा	7106.18	13.63	0	2413.60	56241.30	0	56241.30
13	सांगली	8270.38	180.84	0	1017.26	22768.80	0	22768.80
14	कोल्हापूर	0	3948.69	0	0	56556.73	0	56556.73
15	सोलापूर	2648.83	98.85	0	1158.00	57032.42	0	57032.42
16	अमरावती	1751.72	148859.82	1162.94	1162.92	159611.04	0	159611.04
17	अकोला	198.53	0	0	1003.14	28613.92	0	28613.92
18	वाशिम	0	0	0	0	29842.55	0	29842.55
19	यवतमाळ	0	0	135.72	32522.00	101131.04	0	101131.04
20	बुलढाणा	198.01	0	0	189.00	215157.01	0	215157.01
21	नागपूर	541.51	0	0	675.00	10153.80	0	10153.80
22	वर्धा	1035.23	0	223.66	347.32	35275.55	0	35275.55
23	भंडारा	0	5.73	0	0	15501.66	0	15501.66
24	गोंदिया	275.39	0	75.41	0	1729.67	0	1729.67
25	चंद्रपूर	1756.72	15.00	40.53	338.66	14409.03	0	14409.03
26	गडचिरोली	0	0	2959.74	0	34256.80	0	34256.80
27	छत्रपती संभाजीनगर	939.64	0	0	1726.25	60417.77	0	60417.77
28	जालना	707.00	0	0	0	42832.97	0	42832.97
29	बीड	0	0	0	0	90912.20	0	90912.20
30	परभणी	361.39	0	0	115.12	59004.70	0	59004.70
31	हिंगोली	0	0	0	230.56	21612.97	0	21612.97
32	नांदेड	0	0	166.49	166.49	60397.00	0	60397.00
33	धाराशिव	0	0	259.70	0	53195.16	0	53195.16
34	लातूर	630.38	15.00	51.30	300.00	29689.16	0	29689.16
एकूण एकंदर		**110377.41**	**162473.52**	**5132.77**	**52411.59**	**1819041.39**	**0**	**1819041.39**

दिनांक 31मार्च 2022 अखेर शासनाकडे भरणा करावयाच्या रक्कमा

दायित्वे (रुपये लाखांत)

अ.क्र.	जि.प.चे नांव	मंजुर अनुदानाच्या पेक्षा जास्त अर्थोपाय रक्कम	वर्ष अखेर शिल्लक राहिलेले अखर्चित अनुदान			
			सप्रयोजन	योजनांतर्गत	आस्थापना	इतर
1	2	3	4	5	6	7
1	ठाणे	0	0	0	0	0
2	पालघर	0	66.52	6565.24	1249.10	0
3	रायगड	0	0	0	0	0
4	रत्नागिरी	0	1964.09	12318.94	212.79	0
5	सिंधुदूर्ग	0	0	700.47	283.15	0
6	नाशिक	0	0	4928.57	0	0
7	धुळे	0	15.71	979.11	547.938	431.45
8	नंदूरबार	0	0	5146.82	2247.68	0
9	जळगाव	7457.47	0	0	37434.59	7303.18
10	अहिल्यानगर	0	0	4311.85	1005.70	0
11	पुणे	0	1268.90	3085.77	0	0
12	सातारा	0	0	0	0	0
13	सांगली	0	0	0	0	0
14	कोल्हापूर	0	0	0	0	870.71
15	सोलापूर	0	0	0	0	4000.00
16	अमरावती	0	0	0	0	0
17	अकोला	0	0	0	0	2273.54
18	वाशिम	0	0	0	0	0
19	यवतमाळ	0	0	0	0	0
20	बुलढाणा	0	0	0	0	0
21	नागपूर	0	0	0	0	0
22	वर्धा	0	0	0	0	6778.38
23	भंडारा	0	0	0	0	3991.33
24	गोंदिया	0	0	0	0	0
25	चंद्रपूर	0	0	2404.27	174.37	0
26	गडचिरोली	0	0	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	0	0	0	0	1405.09
28	जालना	0	0	0	0	5464.48
29	बीड	0	0	221.00	0	0
30	परभणी	0	580.57	0	0	0
31	हिंगोली	0	30.77	1611.21	202.32	0
32	नांदेड	0	0	4032.42	9408.98	0
33	धाराशिव	0	0	0	0	0
34	लातूर	0	0	0	0	2506.22
एकूण एकंदर		**7457.47**	**3926.56**	**46305.67**	**52766.61**	**35024.38**

(रुपये लाखांत)

अ.क्र	जि.प.चेनांव	अनुदान निर्धारणा ने नामंजुर केलेले अनुदान	शासकिय हस्तांतरण योजनांपासुन जि.प.कडे जमा उत्पन्न	न.पा.कडून वसुल केलेली प्रा.शि.वर्गणी	निवृत्तीवेतन वर्गणी	जीवन प्राधिकरणास देय असलेली	शासनाकडे भरावयाची इतर व्यपगत रक्कम	एकूण बेरीज (3 ते 13)
		8	9	10	11	12	13	14
1	ठाणे	0	0	0	0	0	2279.90	2279.90
2	पालघर	0	0	0	0	0	0	7880.86
3	रायगड	0	0	0	0	0	0	0
4	रत्नागिरी	0	0	1074.67	0	0	1081.69	16652.18
5	सिंधुदूर्ग	0	0	0	0	2210.47	0	3194.09
6	नाशिक	0	0	0	0	0	0	4928.57
7	धुळे	1400.88	588.64	0	0	0	0	3963.72
8	नंदूरबार	0	0	0	0	0	0	7394.50
9	जळगाव	0	0	0	0	0	0	52195.24
10	अहिल्यानगर	0	0	0	0	0	0	5317.55
11	पुणे	0	0	0	0	0	0	4354.67
12	सातारा	486.54	0	0	0	0	16416.22	16902.76
13	सांगली	0	0	0	0	0	0	0
14	कोल्हापूर	0	0	0	0	0	0	870.71
15	सोलापूर	0	0	0	0	0	0	4000.00
16	अमरावती	0	0	0	0	0	0	0
17	अकोला	0	0	0	0	420.50	0	2694.04
18	वाशिम	0	0	0	0	0	0	0
19	यवतमाळ	0	0	0	0	0	0	0
20	बुलढाणा	0	0	0	0	0	0	0
21	नागपूर	0	0	0	0	0	0	0
22	वर्धा	0	0	0	0	0	0	6778.38
23	भंडारा	0	928.91	0	0	0	0	4920.24
24	गोंदिया	0	0	0	0	0	0	0
25	चंद्रपूर	0	0	0	0	0	0	2578.64
26	गडचिरोली	0	0	0	0	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	0	0	0	0	0	194.34	1599.43
28	जालना	0	0	0	0	0	0	5464.48
29	बीड	0	0	0	0	0	0	221.00
30	परभणी	0	0	0	0	0	0	580.57
31	हिंगोली	0	0	0	0	0	0	1844.30
32	नांदेड	0	0	0	0	0	0	13441.40
33	धाराशिव	0	0	0	0	0	31755.17	31755.17
34	लातूर	0	0	0	0	0	0	2506.22
एकूण एकंदर		**1887.42**	**1517.55**	**1074.67**	0	**2630.97**	**51727.32**	**204318.62**

दिनांक 31 मार्च 2022 अखेर शासनाकडून मिळावयाची अनुदाने (शासकीय योजना)

(रुपये लाखांत)

अ.क्र.	जि.प.चे नांव	अर्थोपाय अग्रिमा पोटी येणे रक्कम	अनुदान निर्धारणाप्रमाणे कमी मिळालेले अनुदान				निवृत्तीवेतनावर जि.प.निधी तुन केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती	अभिकरण योजनेवर जि.प. निधीतुन केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती
			सप्रयोजन	योजनांतर्गत	आस्थापना	एकूण		
1	2	3	4	5	6	7	8	9
1	ठाणे	0	0	0	0	0	0	0
2	पालघर	0	0	0	0	0	0	0
3	रायगड	0	0	0	0	0	0	0
4	रत्नागिरी	0	0	0	0	0	0	0
5	सिंधुदूर्ग	0	0	0	0	0	0	0
6	नाशिक	0	0	0	0	0	0	0
7	धुळे	0	0	1400.88	0	1400.88	0	0
8	नंदूरबार	0	0	0	0	0	0	0
9	जळगाव	0	0	0	0	0	0	0
10	अहिल्यानगर	0	0	0	0	0	0	0
11	पुणे	0	0	0	0	0	0	0
12	सातारा	0	0	0	0	0	0	0
13	सांगली	0	0	0	0	0	0	0
14	कोल्हापूर	0	3948.69	0	0	3948.69	0	0
15	सोलापूर	0	0	0	0	0	0	0
16	अमरावती	0	88894.79	25304.19	34660.84	148859.82	0	0
17	अकोला	0	0	0	0	0	0	0
18	वाशिम	0	0	0	0	0	0	0
19	यवतमाळ	0	0	0	0	0	0	0
20	बुलढाणा	0	0	0	0	0	0	0
21	नागपूर	0	0	0	0	0	0	0
22	वर्धा	0	0	0	0	0	0	0
23	भंडारा	0	0	0	0	0	0	0
24	गोंदिया	0	0	0	0	0	0	0
25	चंद्रपूर	0	0	0	0	0	0	0
26	गडचिरोली	0	0	0	0	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	0	0	0	0	0	0	0
28	जालना	0	0	0	0	0	0	0
29	बीड	0	0	0	0	0	0	0
30	परभणी	0	0	0	0	0	0	0
31	हिंगोली	0	0	0	0	0	0	0
32	नांदेड	0	0	0	0	0	0	0
33	धाराशिव	0	0	0	0	0	0	0
34	लातूर	0	0	0	0	0	15.00	0
एकूण एकंदर		**0**	**92843.48**	**26705.07**	**34660.84**	**154209.39**	**15.00**	**0**

(रुपये लाखांत)

अ.क्र	जि.प.चे नांव	दुष्काळी कामे पाणीपुरवठा करिता जि.प.निधीतुन केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती	शासनाकडुन येणारी इतर रक्कम	न.प.कडून वसुल करावयाची वर्गणी		एकूण बेरीज (3 ते 13)
				प्राथमिक शाळा वर्गणी	इतर वर्गणी	
		10	11	12	13	14
1	ठाणे	0	0	0	0	0
2	पालघर	0	0	0	0	0
3	रायगड	0	0	0	0	0
4	रत्नागिरी	0	885.52	1074.67	0	1960.19
5	सिंधुदुर्ग	0	0	222.53	0	222.53
6	नाशिक	0	0	430.17	0	430.17
7	धुळे	0	0	0	0	1400.88
8	नंदूरबार	0	0	0	0	0
9	जळगाव	0	0	0	0	0
10	अहिल्यानगर	0	0	1308.70	0.00	1308.70
11	पुणे	1135.29	2876.44	9.00	1.76	4022.49
12	सातारा	0	13.63	0	0	13.63
13	सांगली	0	0	180.84	0	180.84
14	कोल्हापुर	0	0	0.34	0	3948.69
15	सोलापुर	0	0	89.85	0	89.85
16	अमरावती	0	0	0	0	148859.82
17	अकोला	0	0	0	0	0
18	वाशिम	0	0	0	0	0
19	यवतमाळ	0	0	0	0	0
20	बुलढाणा	0	0	0	0	0
21	नागपुर	0	0	0	0	0
22	वर्धा	0	0	0	0	0
23	भंडारा	0	5.73	0	0	5.73
24	गोंदिया	0	0	0	0	0
25	चंद्रपुर	0	15.00	0	0	15.00
26	गडचिरोली	0	0	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	0	0	0	0	0
28	जालना	0	0	0	0	0
29	बीड	0	0	0	0	0
30	परभणी	0	0	0	0	0
31	हिंगोली	0	0	0	0	0
32	नांदेड	0	0	0	0	0
33	धाराशिव	0	0	0	0	0
34	लातुर	0	0	0	0	15.00
एकूण एकंदर		**1135.29**	**3796.32**	**3315.76**	**1.76**	**162473.52**

दिनांक 31 मार्च 2022 अखेर पंचायत समिती ग्रामपंचायत व इतर संस्थांना देय अनुदाने

दायित्वे (रुपये लाखात)

अ.क्र	जि.प.चे. नाव	ग्रा.पं. उपकर अनुदान	मुद्रांक शुल्क अनुदान	वाढीव उपकर अनुदान	अल्पबचत प्रोत्साहन अनुदान	व्यवसाय करापोटी ग्रा.पं.ना. द्यावयाची रक्कम	वन अनुदान	इतर	एकूण बेरीज
1	ठाणे	0	707.80	0	0	0	0	0	707.80
2	पालघर	0	873.13	0	0	0	0	0	873.13
3	रायगड	1208.84	3008.61	0	0	0	0	0	4217.45
4	रत्नागिरी	0	442.76	798.41	-19.80	0	0.71	1327.29	2549.37
5	सिंधुदुर्ग	0	0	0	0	0	0	0	0
6	नाशिक	0	1963.12	0	0	0	0.74	0	1963.12
7	धुळे	0	0	0	0	0	0	0	0
8	नंदूरबार	0	0	0	0	0	0	0	0
9	जळगाव	0	572.60	42.14	0	0	0	0	614.74
10	अहिल्यानगर	0	1485.94	0	0	0	1.17	0	1487.11
11	पुणे	0	18570.19	0	0	0	0	14072.78	32642.97
12	सातारा	348.89	840.16	516.25	37.61	0	0	0	1742.91
13	सांगली	0	743.78	317.64	0	0	0	0	1061.42
14	कोल्हापुर	0	0	0	0	0	0	6427.58	6427.58
15	सोलापुर	0	0	0	0	0	0	0	0
16	अमरावती	0	0	0	0	0	0	1886.45	1886.45
17	अकोला	0	74.13	0	0	0	0	914.12	988.25
18	वाशिम	0	0	0	0	0	0	0	0
19	यवतमाळ	0	0	0	0	0	0	0	0
20	बुलढाणा	39.64	124.97	0	0.71	0	0	0	165.32
21	नागपुर	0	4343.56	0	0	0	0	0	4343.56
22	वर्धा	0	0	0	0	0	0	0	0
23	भंडारा	0	0	0	0	0	2.13	0	2.13
24	गोंदिया	0	0	0	0	0	0	0	0
25	चंद्रपुर	65.29	312.88	0	0	0	0	0	378.17
26	गडचिरोली	0	0	0	0	0	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	0	0	0	0	0	0	0	0
28	जालना	0	0	0	0	0	0	0	0
29	बीड	0	899.00	0	0	0	0	0	899.00
30	परभणी	0	0	0	0	0	0	0	0
31	हिंगोली	0	0	0	0	0	0	0	0
32	नांदेड	14.05	490.54	33.20	0	0	1.84	0	539.43
33	धाराशिव	0	0	248.54	0	0	0	0	248.54
34	लातुर	0	0	0	0	0	0	0	0
एकूण एकंदर		**1676.71**	**35453.17**	**1956.18**	**18.52**	**0.00**	**6.59**	**24628.21**	**63739.40**

दिनांक 31 मार्च 2022 अखेर शासनाकडून मिळावयाचे अनुदान

मत्ता (रुपये लाखांत)

अ.क्र	जि.प.चे. नाव	स्थानिक उपकर अनुदान	जि.प. वाढीव उपकर अनुदान	प.स. वाढीव उपकर अनुदान	जमिन महसुल अनुदान	जंगल महसुल अनुदान	मुद्रांक शुल्क अनुदान	अभिकरण योजनेवरील 5% कमिशनची रक्कम	सापेक्ष/मुळ उपकरा वरील अनुदान व इतर	एकूण बेरीज
1	ठाणे	0	0	0	0	0	21937.34	0	0	21937.34
2	पालघर	646.58	0	0	136.04	0	1746.25	26.00	0	2554.87
3	रायगड	0	2303.45	0	0	0	6016.63	0	0	8320.08
4	रत्नागिरी	119.40	490.32	798.41	0	0	0	0	25.48	3510.51
5	सिंधुदुर्ग	711.52	100.26	551.37	192.24	0	1110.23	0	0	2665.62
6	नाशिक	2275.84	0	0	0	0	2221.18	0	0	4497.02
7	धुळे	0	0	0	0	0	0	322.07	0	322.07
8	नंदूरबार	0	0	0	0	0	0	0	0	0
9	जळगाव	0	0	0	0	0	572.60	0	0	572.60
10	अहिल्यानगर	5.47	0	0	0	0	1485.94	50.01	0	1541.42
11	पुणे	727.40	0	0	0	0	37140.38	167.19	0	38034.97
12	सातारा	5232.75	1297.26	996.13	0	0	1026.02	1254.02	0	7106.18
13	सांगली	1321.82	341.39	3176.35	122.71	0	1487.57	22.78	1797.76	8270.38
14	कोल्हापुर	0	0	0	0	0	0	0	0	0
15	सोलापुर	0	0	0	0	0	2648.83	0	0	2648.83
16	अमरावती	0	0	0	0	0	0	0	1751.72	1751.72
17	अकोला	0	50.28	0	0	0	148.25	0	0	198.53
18	वाशिम	0	0	0	0	0	0	0	0	0
19	यवतमाळ	0	0	0	0	0	0	0	0	0
20	बुलढाणा	0	42.16	0	0	0	124.97	30.88	0	198.01
21	नागपुर	0	0	0	0	0	541.51	541.51	0	541.51
22	वर्धा	131.68	0	0	0	0	883.18	20.37	0	1035.23
23	भंडारा	0	0	0	0	0	0	0	0	0
24	गोंदिया	0	6.86	0	60.80	0	130.00	77.73	0	275.39
25	चंद्रपुर	516.90	163.23	163.23	130.59	0	625.77	157.00	0	1756.72
26	गडचिरोली	0	0	0	0	0	0.00	0	0	0
27	छत्रपती संभाजीनगर	0	13.69	20.53	45.05	0	791.00	69.37	0	939.64
28	जालना	169.13	109.45	0	0	0	379.56	0	0	707.00
29	बीड	0	0	0	0	0	0	0	0	0
30	परभणी	52.50	38.40	0	5.25	0	215.24	50.00	0	361.39
31	हिंगोली	0	0	0	0	0	0	0	0	0
32	नांदेड	0	0	0	0	0	0	0	0	0
33	धाराशिव	0	0	0	0	0	0	0	0	0
34	लातुर	14.76	31.53	10.97	0	0	132.43	0	0	630.38
एकूण एकंदर		**9225.75**	**4988.28**	**5716.99**	**692.68**	**0.00**	81364.88	**2247.42**	**25.48**	**110377.41**

प्रकरण दोन

लेखापरीक्षा सर्वसाधारण निष्पत्ती

2.1 लेखापरीक्षा अहवालातील शासकीय अनुदानातील केलेल्या खर्चावरील आक्षेप निकालात काढण्याबाबत विलंब

(अ) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 च्या कलम 10 (1) अन्वये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखापरीक्षण अहवाल मिळाल्यापासुन चार महिन्यांच्या आत अहवालातील आक्षेपांमध्ये दाखविलेल्या उणीवा दूर करण्यात आल्याचा अगर त्याबाबतच्या स्पष्टीकरणाबाबतचा अनुपालन अहवाल संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचेकडे पाठवावयास हवा. तथापि, उपरोक्त अधिनियमात नेमुन दिलेल्या कालावधीत अनुपालन पाठविण्याबाबत झालेल्या विलंबाव्यतिरिक्त ज्यांचे अनुपालन पाठविले नाही किंवा अपुरे पाठविलेले आहे, अशा जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांतील लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित आक्षेपांची संख्या बरीच मोठी आहे.

(ब) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सन 1962-63 ते 2021-2022 या वर्षाच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवालातील शासकिय अनुदानासंदर्भातील परिच्छेदांपैकी मार्च-2022 अखेरीस 217266 परिच्छेद प्रलंबित आहेत. या परिच्छेदांत शासकीय अनुदानातुन झालेल्या खर्चापैकी अमान्य रक्कम रुपये 16583.47 कोटी आहे.

यापूर्वी लेखापरीक्षण अहवालात संपूर्ण आक्षेपाधिन, तात्पुरत्या अमान्य, गुंतलेल्या व वसुलपात्र इत्यादी रकमांचा समावेश असल्यामुळे परिच्छेदातील अंतर्भूत रक्कमेमध्ये अनावश्यक फुगवटा दिसून येत होता. त्यानुषंगाने संचालनालय स्तरावर सन 2021-22 पासून मोहिम राबविण्यात येवून संचालनालयाचे परिपत्रक क्र. स्था.18/ब/कार्या.आदेश/अहवाल/वलेप /न.क्र.183-5/34, दि. 06/09/2022 अन्वये परिच्छेद अंतिम करताना परिच्छेदामध्ये गुंतलेल्या रकमांचे वर्गीकरण सुधारित करुन जिल्हा परिषद स्वनिधीच्या बाबतीत वसुलपात्र तर शासन निधीच्या बाबतीत अंतिम अमान्य असे सुधारित वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार शासकीय अनुदानासंदर्भात थकित परिच्छेद व सदर परिच्छेदांत गुंतलेल्या रकमांचा वर्षनिहाय सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे.

शासकीय अनुदानासंदर्भात थकित परिच्छेदांचा तपशील. (रुपये कोटीमध्ये)

लेखापरीक्षण अहवालाचे वर्ष	शासकीय अनुदानासंदर्भात थकित असलेल्या परिच्छेदांची संख्या	शासकीय अनुदानासंदर्भातील थकित परिच्छेदातील अंतिम अमान्य रक्कम
1962-1963 ते 2015-2016	143004	9725.83
2016-2017 ते 2020-2021	63202	6087.74
2021-2022	11060	769.90
एकूण	**217266**	**16583.47**

2.2 लेखापरीक्षण अहवालातील स्वउत्पन्नातून केलेल्या खर्चावरील आक्षेप निकालात काढण्याबाबत विलंब

(अ) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 च्या कलम 10 (1) अन्वये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लेखापरीक्षण अहवाल मिळाल्यापासुन चार महिन्यांच्या आत अहवालातील आक्षेपांमध्ये दाखविलेल्या उणीवा दूर करण्यात आल्याचा अगर त्याबाबतच्या स्पष्टीकरणाबाबतचा अनुपालन अहवाल संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचेकडे पाठवावयास हवा. तथापि, उपरोक्त अधिनियमात नेमुन दिलेल्या कालावधीत अनुपालन पाठविण्याबाबत झालेल्या विलंबाव्यतिरिक्त ज्यांचे अनुपालन पाठविले नाही किंवा अपुरे पाठविलेले आहे, अशा जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित आक्षेपांची संख्या बरीच मोठी आहे.

(ब) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सन 1962-63 ते 2021-2022 या वर्षाच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवालातील जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वउत्पन्नासंदर्भातील मार्च-2022 अखेरीस 85407 परिच्छेद प्रलंबित आहेत. या परिच्छेदांत जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वउत्पन्नातून झालेल्या खर्चापैकी सुधारित वर्गीकरणानुसार रक्कम रुपये 6346.43 कोटी आहे.जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांचे लेखापरीक्षण अहवालातील स्वउत्पन्नातुन केलेल्या खर्चाच्या संदर्भात थकित परिच्छेदांची संख्या व परिच्छेदांत गुंतलेली रक्कम याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या स्वउत्पन्नासंदर्भात थकित परिच्छेदांचा तपशील (रुपये कोटीमध्ये)

लेखापरीक्षण अहवालाचे वर्ष	जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वउत्पन्नातुन केलेल्या खर्चाच्या संदर्भात थकित असलेल्या परिच्छेदांची संख्या	जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वउत्पन्नातुन झालेल्या खर्चासंबंधी परिच्छेदांतील वसूलपात्र रक्कम
1962-1963 ते 2015-2016	48981	2732.21
2016-2017 ते 2020-2021	31365	3176.35
2021-2022	5061	437.87
एकूण	**85407**	**6346.43**

2.3 जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील भार व अधिभाराची प्रकरणे

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, 1930 च्या 10(3) कलमान्वये कायद्याविरुध्द केलेल्या प्रदानाच्या तसेच अक्षम्य हयगय किंवा गैरवर्तणूक यामुळे झालेल्या स्थानिक निधीच्या नुकसान प्रकरणी गुंतलेल्या रकमांचा भार किंवा अधिभार करुन वसुल करण्यासंबंधीची शिफारस सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी विभागीय आयुक्तांना करावयाची असते. स्थानिक निधीचा बेकायदेशीर वापर व अक्षम्य हयगय किंवा गैरवर्तणूक यामुळे होणा-या आर्थिक नुकसानीच्या प्रकारांना आळा बसावा व स्वत:च्या पैशाप्रमाणेच स्थानिक निधीचा विनियोग करतानाही अधिकारी व कर्मचारीवर्गाने यथायोग्य दक्षता, दुरदर्शीपणा दाखवावा या धारणेने वरील तरतुद केलेली आहे.

(अ) भार प्रकरणे :- 31 मार्च 2022 अखेर विभागीय आयुक्तांकडे भार संदर्भात **1905** प्रकरणे प्रलंबित आहेत व त्यामध्ये रुपये **12648.41** लाख एवढी रक्कम अंतर्भूत आहे. सन 2021-2022 या वर्षाअखेर शिल्लक प्रकरणांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे **:-**

भार प्रकरणे (रुपये लाखात)

वर्ष	एकूण प्रकरणे	रक्कम
1962-63 ते 2016-2017	1870	12553.68
2017-2018	09	2.84
2018-2019	23	80.90
2019-2020	03	10.99
2020-2021	0	0
2021-2022	0	0
एकूण	**1905**	**12648.41**

(आ) अधिभार प्रकरणे :- 31 मार्च 2022 अखेर विभागीय आयुक्तांकडे अधिभार संदर्भात **1309** प्रकरणे प्रलंबित होती व त्यामध्ये रुपये **9607.15** लाख एवढी रक्कम अंतर्भूत आहे. सन 2021-2022 या वर्षाअखेर शिल्लक प्रकरणांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे:-

अधिभार प्रकरणे **(रुपये लाखात)**

वर्ष	एकूण प्रकरणे	रक्कम
1962-63 ते 2016-2017	1248	9296.42
2017-2018	20	3.42
2018-2019	32	258.38
2019-2020	09	48.93
2020-2021	0	0
2021-2022	0	0
एकुण	**1309**	**9607.15**

2.4 जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील दुर्विनियोगाची प्रकरणे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम क्रमांक 36 च्या तरतुदीनूसार शोधून काढलेली किंवा संशयास्पद परिस्थितीवरून सकारण अनुमानित अशा लबाडी व अपहाराच्या प्रकरणांची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी करावयाची असते. अपराधी व्यक्तीला वेळीच शासन करावयाच्या कामी त्वरीत कार्यवाही केली जावी व अशा प्रकरणांना आळा बसावा, हा या तरतुदीमागील उद्देश आहे. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाद्वारे निर्गमित नियमित लेखापरीक्षण अहवालामध्ये अशा प्रकरणांचा अंतर्भाव केला जातो.

अशा प्रकरणांची त्वरित दखल घेण्यासंबंधी विशेष आदेश देण्यात आले असले तरी बरीच प्रकरणे अजून निकाली काढावयाची आहेत**,** हे या अहवालातील माहितीवरुन दिसून येते.

दिनांक 31 मार्च, 2022 अखेर दुर्विनियोगाची प्रलंबित प्रकरणे **1754** असून त्यामध्ये गुंतलेली रक्कम रुपये **9624.20** लाख आहे. प्रलंबित प्रकरणे व त्यामध्ये अंतर्भूत असलेली रक्कम यांचा वर्षनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

अफरातफर प्रकरणे **(रुपये लाखात)**

वर्ष	एकूण प्रकरणे	गुंतलेली रक्कम
1962-63 ते 2016-2017	1738	9419.63
2017-2018	11	179.73
2018-2019	01	9.71
2019-2020	01	2.01
2020-2021	02	4.21
2021-2022	01	8.90
एकूण	**1754**	**9624.20**

जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांच्या अभिलेख्यांवरील अभिप्राय

2.5 जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांच्या लेख्यांबाबत सर्वसाधारण अभिप्राय

पुर्वीच्या अहवालामध्ये जिल्हा परिषदांनी विविध लेखे व नोंदवहया सुस्थितीत ठेवल्या नसल्याचे दाखवून दिले होते. अहवाल कालावधीमध्ये लेख्यांच्या स्थितीत विशेष सुधारणा झालेली दिसुन आलेली नाही. त्यांचे मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे विविध उपबंधाचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, हे आहे. जिल्हा परिषदांचा बहुतांश खर्च जरी पंचायत समिती पातळीवर करण्यात येत असला, तरी सर्व प्रमाणके, चलने, संकलन पत्रे इत्यादी जिल्हा परिषद व्यवहारांचे संकलित लेखे गट विकास अधिका-यांनी जिल्हा परिषदांच्या वित्त विभागाला आणि कामे व योजना संबंधीच्या प्रगती नोंदवहयांमध्ये खर्चाची नोंद घेण्यासाठी निरनिराळया विभाग प्रमुखांना तत्परतेने सादर केले नव्हते. परिणामत: लेखे वेळेवर तपासले जात नव्हते व लेख्यांमध्ये निरनिराळया प्रकारचे चुकीचे वर्गीकरण झाले. काही जिल्हा परिषदा, लेखासंहितेत विहीत केल्याप्रमाणे 30 जुन रोजी आपले लेखे बंद करु शकल्या नाहीत. वित्तीय वर्ष संपल्यानंतर संचालकांकडे काही जिल्हा परिषदांनी उशिराने प्रमाणपत्र दिलेले व संकलित केलेले लेखे सादर करण्यात आले आहेत.

या विभागाकडे जिल्हा परिषदांचे वार्षिक लेखे प्रमाणित करुन देण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांकडुन वार्षिक लेखे या विभागाकडे तपासणीसाठी सादर करण्यात आल्यावर या विभागाच्या लेखापरीक्षकांकडुन तपासले जातात. परंतु सदर तपासणीत ब-याच उणीवा आढळतात. पर्यायाने सदर उणीवा दुर करण्यासाठी संबंधित लेखे जिल्हा परिषदांकडे पाठवावे लागतात. जिल्हा परिषदांच्या वार्षिक लेख्यांमध्ये प्रामुख्याने खालील उणीवा आढळतात.

(1) वार्षिक लेखे विहीत मुदतीत बंद करीत नाहीत. तसेच त्याबाबत कारणे दिली जात नाहीत.
(2) लेख्यांसोबत विहित केलेली विवरणपत्रे जोडली जात नाहीत अगर ती अपूर्ण असतात.
(3) लेख्यांमध्ये दाखविलेले अनुदान व विवरणपत्रात दिलेले अनुदान यामध्ये तफावत असते.
(4) संकिर्ण जमा रकमांचा तपशिल दिला जात नाही.
(5) लेख्यांमधील खाडाखोडी साक्षांकित केलेल्या नसतात.

मागील वर्षीच्या मानाने वार्षिक लेखे सादर करण्यात विशेष प्रगती दिसून आली नाही.

2.6 लेख्यांच्या संबंधातील महत्वाच्या नियमबाहय गोष्टी.

चाचणी लेखापरीक्षेमध्ये उघडकीस आलेल्या आणि संबंधित लेखापरीक्षा अहवालात समाविष्ट असलेल्या काही लेख्यांच्या संबंधातील सन 2021-2022 मधील महत्वाच्या नियमबाहय गोष्टी आणि लेखा नोंदवहया योग्य रितीने न ठेवण्याच्या बाबी संक्षिप्तपणे जिल्हा परिषद विभागाचे बाबतीत प्रकरण तीनचे अखेरीस व पंचायत समित्याचे बाबतीत प्रकरण चार चे अखेरीस नमूद केलेल्या आहेत.

लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न करणे.

स्थानिक निधी लेखा अधिनियम 190 मधील कलम (3) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढया कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्यांना देण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम 6(1)

नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी केली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरीक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेखे उपलब्ध करुन दिले जात नाहीत. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच, गटविकास अधिकारी यांना 15 दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते.

तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करुन देवुनही लेखापरीक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही.

2021-2022 या वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी निवडक 23 जिल्हा परिषद विभागांचे व 41 पंचायत समित्यांचे अभिलेखे उपलब्ध करण्यात आले नाहीत. लेखापरीक्षणासाठी उपलब्ध न करण्यात आलेल्या अभिलेख्यांच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निहाय एकत्रित तपशिल प्रकरण क्रमांक 3 व 4 मधील परिच्छेद क्रमांक 3.903 व 4.672 मध्ये नमूद करण्यात आला आहे.

कर्जे

2.7 शासनाकडून मिळालेली एकूण कर्जे

(अ) शासनाकडून मिळालेली कर्ज :-जिल्हा परिषदांनी वेगवेगळया प्रयोजनासाठी (उदा. घरबांधणी, नळपाणी पुरवठा, शेती औजारे, लघुउद्योग धंदे, कुक्कुटपालन योजना, जमीन सुधारणा सकस आहार योजना इत्यादी) शासनाकडून सन 2021-2022 पर्यंत मिळालेल्या कर्जाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. सदर तपशीलावरुन असे दिसून येईल की, जिल्हा परिषदांना फारच मोठी कर्जाची रक्कम अद्यापही शासनाकडे परत करावयाची आहे.

(रुपये लाखांत)

मागिल शिल्लक		चालु वर्षाचे नवीन		एकूण	
कर्जे	व्याज	कर्जे	व्याज	कर्जे	व्याज
1	2	3	4	5	6
69.24	19.97	0.38	0.95	69.62	20.92

सन 2020-2021 परतावा हप्ता		प्रत्यक्ष भरणा केलेली रक्कम		शिल्लक राहिलेले एकूण	
कर्जे	व्याज	कर्जे	व्याज	कर्जे	व्याज
7	8	9	10	11	12
68.81	20.92	3.20	3.04	66.42	17.88

(ब) व्याजरहित इतर शासकीय कर्जे :- शासनाकडून जिल्हा परिषदांना वेगवेगळया प्रयोजनांसाठी (उदा.बागायत, विहीरी, दुभती जनावरे, जमीन सुधारणा, शेती औजारे, शेती सुधारणा इत्यादी) सन 2020-2021 पर्यंत बिनव्याजी कर्जे मिळाली त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखांत)

मागील शिल्लक	सन 2021-22 कर्जे	एकूण	सन 2020-2021 मध्ये परतावा करावयाचा हप्ता	भरणा केलेले हप्ते	शिल्लक राहिलेली कर्जे
1122.00	--	1122.00	--	--	1122.00

टिप:- (1) वरील माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन घेण्यात आलेली आहे.

(2) जिल्हा परिषद बुलढाणा वगळता इतर जिल्हा परिषदांची व्याजरहीत शासकीय कर्जांबाबत माहिती निरंक असल्याचे कळविले आहे.

(क) जिल्हा परिषदेने इतर संस्थांकडून सन2021-2022 मध्ये घेतलेली कर्जे-

निरंक

2.8 जिल्हा परिषदांनी दिलेली व्याज व व्याजरहित कर्जे

जिल्हा परिषदांनी सन 2021-2022 अखेर वेगवेगळया कारणांसाठी (उदा.घरबांधणी, वाहन अग्रिम इत्यादी) विविध प्रकारची दिलेली कर्जे व कर्जाची वसुलीयोग्य रक्कम या संबंधातील दिनांक 31 मार्च 2022 रोजी असलेली स्थिती पुढील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे आहे.

(रुपये लाखांत)

मागील शिल्लक		सन 2021-2022 वर्षाचे		एकूण	
कर्ज	व्याज	कर्जे	व्याज	कर्जे	व्याज
692.14	73.88	164.25	43.69	856.39	117.57

सन 2021-2022मध्ये केलेली वसुली		31 मार्च,2022 अखेर शिल्लक	
कर्जे	व्याज	कर्जे	व्याज
136.09	32.97	720.30	84.60

टिप :- (1) वरील माहिती जिल्हा परिषदांनी पुरविलेल्या सांख्यिकी माहितीवरुन घेण्यात आलेली आहे.

2.9 करांच्या मागणी, वसुली व थकबाकीबाबत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 157 मधील तरतुदीस अधिन राहुन जिल्हा परिषदांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये स्थानपरत्वे निरनिराळे कर बसविले आहेत. (उदा. बिगरशेती, पाणीपट्टी, व्यवसाय, घरपट्टी इत्यादी).

दिनांक 31 मार्च 2022 अखेरच्या थकबाकीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

एकुण मागणी			एकुण वसुली			सूट	एकुण शिल्लक		
थकित	चालू	एकुण	थकित	चालू	एकुण		थकबाकी	चालू	एकुण
47397	115375	162772	31122	786483	109770	0	16275	36727	53002

आकारण्यात आलेल्या करांची वसुली करणे सुलभ जावे म्हणुन उपरोक्त अधिनियमाच्या कलम 166 ते 177 अन्वये जिल्हा परिषदांना अधिकार प्रदान केले आहेत. तथापि, सदर अधिकाराचा वापर योग्यप्रकारे केला जात नसल्याचे वसुली व थकबाकी यांच्या आकडेवारीवरुन दिसून येईल. तरी जिल्हा परिषदांनी त्यांच्या महसुलाच्या वसुलीबाबत दक्ष राहुन कार्यवाही करणे आवश्यक आहे.

*****